# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक:03.09.2026** **वार:गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार.
2. बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी कृषीमंत्री शिवराज सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत बैठक.
3. नेपाळमधील पूरबळींची संख्या बाराशेवर; भारताकडून मदतीची पाचवी खेप पोहोचली.
4. महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि हाँगकाँग यांच्यात लढत.
5. मध्यप्रदेशातील काही भागात आज मुसळधार पावसाचा इशारा.

**भारत-बेल्जिअम**

भारत आणि बेल्जिअम दरम्यान द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बेल्जियमचे पंतप्रधान बार्ट डी वेव्हर यांच्या दरम्यान आज नवी दिल्लीत बैठक होणार आहे. बेल्जियमचे पंतप्रधान भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर काल रात्री नवी दिल्लीत दाखल झाले. त्यांच्याबरोबर बेल्जियमचे संरक्षण मंत्री थियो फ्रँकेन उपस्थित असतील. भारतीय उद्योग महासंघाच्या 'भारत-युरोपियन संघटना मुक्त व्यापार करारा'च्या संदर्भात ते आपले विचार मांडतील. भारत-बेल्जियम भागीदारी अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने तसंच व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण तसंच अक्षय ऊर्जा यांसारख्या परस्पर हिताच्या क्षेत्रांमधील सहकार्य पुढे नेण्यासाठी यावेळी दोनही नेत्यांमध्ये चर्चा अपेक्षित आहे.

**जल-शक्ती**

लोकसंख्या वाढ आणि भविष्यातील पाण्याची गरज यांसारख्या वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी संवेदनशिलता बाळगावी असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. 'जलशक्ती मंत्रालया'द्वारे आयोजित पाण्याबाबतच्या दोन दिवसीय 'राष्ट्रीय विभागीय परिषदे'च्या समारोप सत्रात ते काल नवी दिल्लीत बोलत होते. पाणी बचतीचे तंत्रज्ञान स्वीकारावं, भारतीय उत्पादनाशी संबंधित घटकांना कार्यक्षम उपाययोजना विकसित करण्यास सक्षम करावं, जागतिक स्तरावरील सर्वोत्तम पद्धतींची माहिती देणाऱ्या विशेष प्रदर्शनांचे आणि कार्यशाळांचे आयोजन करावं अशा सूचना त्यांनी केली.

**शिवराज सिंह चौहान**

केंद्रीय कृषी आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान आज मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. बँका आणि राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाचे प्रतिनिधीची उच्चस्तरीय बैठक आज शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. बचत गटांना दिल्या जाणाऱ्या कर्जाची सरासरी रक्कम वाढवण्यासाठी तसंच वैयक्तिक स्तरावरील उपक्रमासाठी कर्ज रक्कम दुप्पट करण्यावर या बैठकीत प्रामुख्याने भर दिला जाईल. या बैठकीला रिझर्व्ह बँक, वित्तीय सेवा विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी बँका, नाबार्ड, पीएफआरडीए, केंद्रीय मंत्रालये, राज्य ग्रामीण उपजीविका अभियान आणि इतर प्रमुख संबंधित संस्थांचे वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती ग्रामीण विकास मंत्रालयानं निवेदनाद्वारे दिली आहे.

**उत्तरप्रदेश-लसीकरण**

महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचा प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने उत्तर प्रदेशात, आजपासून 17 सप्टेंबरपर्यंत एचपीव्ही लसीकरणाची विशेष मोहीम राबवली जाणार आहे. राज्यातील सर्व 75 जिल्ह्यांमध्ये या मोहिमेअंतर्गत 14 वर्षे

वयोगटातील एकंदर 10 लाख पात्र किशोरवयीन मुलींना एचपीव्ही लस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. पात्र मुली आणि त्यांच्या पालकांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा असं आवाहन लखनौचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. एन. बी. सिंग यांनी केलं आहे.

**जपान-मुल्यांकन श्रेणी वाढ**

सरकारच्या आर्थिक जबाबदाऱ्यांची वेळेवर पूर्तता करण्याच्या एकूण क्षमतेबाबत दिल्या जाणाऱ्या मुल्यांकनात 'जपान क्रेडिट रेटिंग संस्थेने भारताची 'दीर्घकालीन परकीय चलन' आणि 'स्थानिक चलन' विषयक श्रेणी एका टप्प्याने वाढवून 'A' अशी केली आहे. रेटिंगमधील ही सुधारणा भारताची भक्कम आर्थिक वाढ, विकासाचा पाया बळकट करण्यात आर्थिक धोरणांची परिणामकारकता आणि आर्थिक प्रणालीची सुधारलेली सुदृढता दर्शवते. असं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. जागतिक स्तरावरील आव्हानात्मक परिस्थिती असतानाही ही सुधारणा झाली आहे.

**दिशा सालियन-हायकोर्ट आदेश**

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं काल केंद्रीय अन्वेषण विभागाला दिले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजे भोसले यांच्या खंडपीठासमोर काल या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यावेळी दिशा हिचे वडील सतीश सालियन यांचा जबाब नोंदवण्यासाठी आणि तक्रार दाखल करण्यासाठी एका वरिष्ठ आणि अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश न्यायालयानं सीबीआयला दिले. मात्र, तपासादरम्यान, सबळ पुराव्यांशिवाय कोणालाही आरोपी मानलं जाणार नाही, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं. दिशा सालियन हिचा 8 जून 2020 रोजी मुंबई उपनगरातल्या एका निवासी इमारतीच्या 12व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता.

**स्वॅप सुविधा**

अमेरिकन डॉलर आणि भारतीय रुपया यामधील फॉरेक्स स्वॅप सुविधेअंतर्गत गेल्या 31 ऑगस्टपर्यंत 136 अब्ज अमेरिकन डॉलर्सहून अधिक परकीय चलन प्राप्त झालं आहे. अशी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने काल दिली. पश्चिम आशियातील युध्द आणि जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रुपयाचे मूल्य घसरत असताना डॉलरचा ओघ वाढवण्यासाठी, रिझर्व्ह बँकेने 8 जून पासून विशेष फॉरेक्स स्वॅप सुविधा सुरू केली होती.

**ट्रंप**

रशियाने युक्रेनमध्ये सुरू असलेलं युद्ध संपवण्यासाठी शांतता कराराच्या दिशेने पावले उचलण्याची तयारी दर्शवल्यास रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याबरोबर आणखी एक शिखर परिषद स्तरावरील चर्चा करण्यास आपण तयार असल्याचं  अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. रशिया-युक्रेन युद्ध विरामासाठी चर्चा करण्याच्या उद्देशाने ट्रम्प आणि पुतिन यांची यापूर्वी ऑगस्ट 2025 मध्ये अलास्का इथं भेट झाली होती.

**नेपाळ**

नेपाळमधील पूरबळींची संख्या 1,200 वर पोहोचली आहे आणि 4 हजारहून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. नेपाळच्या पूर दुर्घटनेत मृत झालेल्या भारतीय नागरिकांची ओळख पटवण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून डीएनए चाचणी करण्यात येणार आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक या तीन ठिकाणी डीएनए नमुना संकलन आणि संबंधित प्रक्रिया करण्यात येणार आहे.

दरम्यान, भारताने पूरग्रस्त नेपाळमधील मदत कार्याची व्याप्ती आणखी वाढवली आहे. भारताकडून आपत्कालीन साहित्याचा पाचवी खेप काल नेपाळला पोहोचली असल्याचं नेपाळमधील भारताच्या राजदूतांनी समाजमाध्यमावरील संदेशांत दिली आहे. या विमानातून साडेपाच टन आवश्यक औषधांसह, बोगद्यातील बचावकार्यासाठी लागणाऱ्या विशेष उपकरणांनी सज्ज असलेले 11 सदस्यांचे बचाव पथकही दाखल झालं आहे. गेल्या महिन्याच्या 26 तारखेला नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या अचानक

पुरामुळे उत्तर आणि मध्य नेपाळमध्ये मोठं नुकसान झालं आहे. भारताने दिलेल्या तत्पर प्रतिसादाबद्दल नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह यांनी काल संसदेत बोलताना भारताचे आभार मानले.

**राम मंदीर ट्रस्ट-नियुक्ती**

उत्तर प्रदेशमधील अयोध्येत, 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'चे पहिले मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून हवाई दलाच्या पश्चिम विभागाचे माजी प्रमुख, निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची काल नियुक्ती करण्यात आली. ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांच्या अध्यक्षतेखाली अयोध्येत झालेल्या बैठकीनंतर या नियुक्तीची घोषणा करण्यात आली.

**गडकरी**

भारतात वाढत्या रस्ते अपघातांच्या संख्येबद्दल चिंता व्यक्त करत, रस्ते सुरक्षा ही एक मोठी चिंतेची बाब असल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल सांगितलं. नवी दिल्ली इथं आयोजित एका परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. दरवर्षी रस्ते अपघातांमध्ये सुमारे 1 लाख 80 हजार लोकांचा मृत्यू होतो. देशातील रस्ते अपघात आणि त्यातील जीवितहानी कमी करण्यासाठी अधिक जन-जागृती आणि वाहन चालवताना जबाबदार वर्तनाची गरज असल्याचं ते म्हणाले.

**इस्रो**

EOS-05 हा अत्याधुनिक पृथ्वी निरीक्षण उपग्रह उद्या प्रक्षेपित केला जाणार आहे. श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून, GSLV-F17 या प्रक्षेपकाद्वारे पहाटे तीनच्या सुमारास उपग्रहाचं प्रक्षेपण केलं जाईल.  EOS-05 या उपग्रहामुळे पृथ्वी निरीक्षणाची क्षमता अधिक बळकट होईल, अशी माहिती इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी काल तिरूमला इथं दिली.

**साउथ वेल्स-राज्य भागीदारी**

ऑस्ट्रेलियातील न्यू साउथ वेल्स आणि महाराष्ट्र राज्यांदरम्यान गेल्या चौदा वर्षांपासून असलेली भागीदारी अधिक व्यापक करण्याचा निर्धार काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री आणि न्यू-साऊथ वेल्सचे प्रमुख क्रिस मेन्स यांच्या उपस्थितीत काल दोन्ही राज्यांदरम्यान विविध क्षेत्रांसाठी सामंजस्य करार करण्यात आले.

**क्रिकेट**

संयुक्त अरब अमिरात इथं सुरू असलेल्या महिलांच्या टी-20 आशिया करंडक  स्पर्धेत 'अ' गटात, आज संध्याकाळी भारताचा दुसरा सामना हाँगकाँगशी होणार आहे. रात्री 8 वाजता सामना सुरू होईल. रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं थायलंडवर 94 धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

**हवामान**

मध्य प्रदेशामधील पुर्वेकडील भागात अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. आंध्र प्रदेश, जम्मू-काश्मीर, लडाख, महाराष्ट्र, ओडिशा, तेलंगणा आणि कर्नाटकच्या काही भागात जोरदार वाऱ्यांसह वादळी पावसाची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.